## आदेश निशाणी क्रमांक १८ वर पारित

१) प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दावा दुरुस्ती करीता दाखल केलेला आहे. सदर वादीच्या म्हणण्याप्रमाणे प्रस्तुत दावा दाखल करतानां टंकलेखनाच्या चुकीमुळे त्यांच्या कडून दाव्यात दावा मिळकतीचे गाव, गट क्रमांक व चर्तुःसीमा या चुकीच्या नमूद केलेल्या आहे. त्यामुळे सदर दुरुस्ती करीता वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

२) प्रस्तुत अर्जास प्रतिवादी यांनी खुलासा दाखल करुन, असे नमूद केले आहे की, वादी यांनी प्रस्तूत अर्जात त्यांना निश्चीत काय दुरुस्ती करायची आहे, हे त्यांनी नमूद केलेले नसून, सदर अर्ज मोघम स्वरुपाचा आहे. त्यामुळे प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्ज नामंजूर करण्याची विनंती केलेली आहे.

३) प्रस्तुतचा अर्ज, त्यावरील लेखी खुलासा व अभिलेखावरील सर्व दस्तऐवजांचे अवलोकन केले. तसेच दोन्ही पक्षकारांच्या विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुत अर्जात पुढील प्रमाणे मुद्दे निश्चित होतात. त्यावर मी कारणमिमांसेसह निष्कर्ष नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | वादी हे त्यांच्या मागणी प्रमाणे दावा दुरुस्ती करुन मिळण्यास पात्र आहे काय ? | **होकारार्थी** |
| २) | काय आदेश ? | **अंतिम आदेशा प्रमाणे** |

**:: कारणमिमांसा ::**

**मुद्दा क्रमांक १ करीता :–**

४) प्रस्तुत दावा वादी यांनी वाटप व दरम्यानचा नफा मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. तसेच सदर दावा आज रोजी वादीच्या पुराव्या कामी प्रलंबीत आहे. सदर अर्जातील मागणीचा विचार केला असता, वादीने दाव्यात दावा मिळकतीची चर्तुःसीमा नमूद केलेली नाही. तसेच त्याबाबत वादीने टंकलेखनाच्या चुकीचे कारण नमूद केलेले आहे. सदर कारणाचा विचार केला असता, दिलेले सदर कारण, प्रथमदर्शी संयुक्तीक वाटते.

५) तसेच प्रस्तूत दाव्यातील वाद प्रश्न गुणवत्तेवर निकाली काढण्यासाठी दाव्यात दावा मिळकतीचे वर्णन नमूद असणे आवश्यक आहे. तसेच सदर दुरुस्तीस परवानगी दिल्यामुळे, दाव्याच्या मुळ स्वरुपात कुठलाही बदल होणार नाही व

त्यामुळे प्रतिवादीचे देखील कुठलेही नुकसान होणार नाही. त्यामुळे दाव्यातील मागणी व प्रस्तुत अर्जा नमूद केलेले कारण विचारात घेता, प्रस्तुत अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. त्यामुळे वरील कारणमिमांसेचा विचार केला असता, **मुद्दा क्रमांक १ चे उत्तर मी होकारार्थी नोंदवित आहे**.

**मुद्दा क्रमांक २ करीता :–**

६) मुद्दा क्रमांक २ च्या निष्कर्षासाठी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**// आ दे श //**

१) प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे आदेश ६ नियम १७ अन्वये मंजूर करण्यात येत आहे.

२) अर्जदार यांना प्रस्तुत अर्जातील मागणी प्रमाणे दावा दुरुस्त करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

३) अर्जदार यांनी आज पासून १४ दिवसांच्या आत दावा दुरुस्त करुन, त्याची दुरुस्ती प्रत अभिलेखावर दाखल करावी.

स्वा–
(भरत सं. जगदाळे)
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
न्यायालय क्र. १, दिग्रस.

ठिकाण :– दिग्रस.
दिनांक :– २०/१२/२०२३